श्री.अमोल मारुती सुर्यवंशी, तत्का कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती जामखेड यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने सुरु करणेत आलेल्या विभागीय चौकशीसाठी सादरकर्ता अधिका-याची नेमणुक करणेबाबत.

**अहिल्यानगर जिल्हा परिषद**
**सामान्य प्रशासन विभाग**
**जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/२३९०८३१/४४१/२०२६**
**अहिल्यानगर दिनांक - ०८/०६/२०२६**

वाचा:- १. इकडील निलंबन आदेश साप्रवि-१/आस्था-३/०९२२/१३५/२०२३ दिनांक २५/०१/२०२३
२. इकडील दोषारोपपत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/०९२२/११७५/२०२३ दि ०६/०९/२०२३
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील पत्र क्र.वशि/आस्था-१/१८८८/२०२३ दिनांक २७/०९/२०२३ समवेत श्री सुर्यवंशी यांची पोहोच दि २७/०९/२०२३
४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील पत्र क्र.वशि/१-आस्था/२०६८/२०२३ दि २५/१०/२०२३ समवेत श्री सुर्यवंशी यांचा खुलासा दि ०४/१०/२०२३
५. इकडील आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था३/२३९०८३१/१०६३/२०२५ दि ०९/१०/२०२५
६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६ (५)

उक्त संदर्भ क्रमांक ५ च्या आदेशान्वये श्री.अमोल मारुती सुर्यवंशी, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) पंचायत समिती जामखेड यांचे प्रकरणी विभागीय चौकशी सुरु करणेत येऊन चौकशी अधिकारी, व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणुक करणेत आलेली आहे. सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री.अशोक बबन गाडे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती जामखेड यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

तरी श्री अशोक बबन गाडे, सहाय्यक प्रशासन अधिकारी हे दिनांक ३१/०५/२०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त होत आहे. तरी श्री सुर्यवंशी यांच्या विभागीय चौकशीकामी सादरकर्ता अधिकारी श्री.अशोक बबन गाडे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती जामखेड यांच्या ऐवजी श्री महारुद्र नामदेव घोडके, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती जामखेड यांची सादरकर्ता अधिकारी म्हणुन नेमणुक करणेत येत आहे. संदर्भ क्रमांक ५ च्या आदेशातील अटी व शर्ती जशास तसे लागु राहतील.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202606080401046 असा आहे.

(राहुल शेळके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

मा.मु.का.अ यांच्या मान्यतेने

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), नाशिक विभाग, नाशिक.
२. श्री महारुद्र नामदेव घोडके, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती जामखेड
**व्दारा व प्रत**- गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड
२/-सदर आदेशाची प्रत श्री महारुद्र नामदेव घोडके, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती जामखेड, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

..२

३. श्री.अशोक बबन गाडे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती जामखेड
**व्दारा व प्रत**- गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड
२/- श्री सुर्यवंशी यांचे विभागीय चौकशी प्रकरणी आवश्यक सर्व दस्तऐवज श्री घोडके यांचेकडे सुपुर्त करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

४. श्री.अमोल मारुती सुर्यवंशी, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) प्रा.आ.केंद्र लोणी व्यंकनाथ ता श्रीगोंदा
व्दारा :- वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र लोणी व्यंकनाथ ता श्रीगोंदा
२/-सदर आदेशाची प्रत श्री.सुर्यवंशी ए एम, कनिष्ठ सहाय्यक यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

(राहुल शेळके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

**मा.मु.का.अ यांच्या मान्यतेने**